


■ दैनिक ■ धाराशिव ■ अंक 202 ■ वर्ष 2 रे ■ बुधवार, दि. 3 सप्टेंबर 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रु 5

# सरकारची शिष्टाई सफल; मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सोडताच राज्यभर जल्लोष

## हैदराबाद गॅझेटिअर लागू करण्याचा जीआर काढला

**आरंभ मराठी | धाराशिव**

मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या मराठा आरक्षण आंदोलनाला पाचव्या दिवशी अखेर मोठे यश मिळाले. राज्य सरकारने त्यांच्या बहुतांश मागण्या मान्य केल्या असून, यासंदर्भात जीआर देखील काढला. हैदराबाद गॅझेटियर लगेच लागू करण्याचा जीआर मनोज जरांगे पाटील यांच्याकडे दिल्यानंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याहस्ते लिंबूपाणी घेऊन जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतले. जरांगे पाटील यांच्या बहुतांश मागण्या राज्य सरकारने मान्य केल्यामुळे राज्यभर मराठ्यांनी मोठा जल्लोष केला. धाराशिव शहर आणि जिल्ह्यातही दुपारनंतर आबालवृद्धांनी रस्त्यावर उतरून जल्लोष केला. हैदराबाद गॅझेट लागू केल्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील जवळपास सर्वच मराठा समाजाला त्याचा फायदा होणार आहे. जरांगे पाटील यांच्या संघर्षमय आंदोलनाचा पाचव्या दिवशी सुखद शेवट झाला.

मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी दिनांक २९ ऑगस्ट पासून मुंबईत आंदोलन सुरू केले होते. मुंबईच्या आझाद मैदानावर त्यांचं आंदोलन सुरू होते. पाच दिवस झाले तरी आंदोलनावर तोडगा निघत नव्हता. त्यातच उच्च न्यायालयाने मंगळवारी सकाळी सुनावणी घेऊन दुपारी तीनपर्यंत आंदोलन बंद करून सर्व रस्ते रिकामे करण्याचा निकाल दिला होता. त्यामुळे आंदोलनस्थळी तणाव निर्माण झाला होता. मात्र, राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने जरांगे यांची भेट घेऊन शिष्टाई करण्यासाठी प्रयत्न केले. दुपारी तीन वाजता राज्य सरकारने मनोज जरांगे यांच्या जवळपास संपूर्ण मागण्यांबाबत महत्वाचा निर्णय घेतला आहे. हैदराबाद गॅझेट, सातारा, औंध गॅझेटची अंमलबजावणी करण्याचा निर्णय सरकारने घेतला. मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने स्थापन केलेल्या उपसमितीने केलेल्या शिफारशींना मराठा अभ्यासकांनी आणि वकिलांनी आंदोलनस्थळी संमती दिली. या शिफारशींवर झालेल्या चर्चेनंतर सरकारकडून तातडीने हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा जीआर काढण्यात आला. या निर्णयामुळे मराठा आरक्षणाचा मार्ग मोकळा झाल्याचे मानले जात आहे.

### सातारा, औंध गॅझेटबाबत हा निर्णय घेतला

सातारा गॅझेटची अंमलबजावणी करण्याची मागणी देखील जरांगे पाटील यांनी केली होती. त्याबाबत सरकारने स्पष्ट केले की, सातारा संस्थान, पुणे व औंध गॅझेटची अंमलबजावणी करण्याबाबत तपासून निर्णय घेण्यात येईल. मात्र, सरकारच्या मते १५ दिवसांत कायदेशीर त्रुटी दूर करून अंमलबजावणी करण्यास सरकारने होकार दिला आहे. हैदराबाद गॅझेट आणि सातारा गॅझेटचे असे दोन वेगळे विषय सरकारने केले आहेत. सातारा गॅझेट बाबत काही कायदेशीर त्रुटी असल्यामुळे त्या दूर करण्यासाठी सरकारने वेळ मागितला.

### हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी

जरांगे पाटील यांच्यासोबत केलेल्या चर्चेनंतर उपसमितीने असा निर्णय घेतला की, हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीच्या प्रस्तावित मागणीसाठी शासन निर्णयाला मंत्रिमंडळ उपसमिती मान्यता देत आहे. या शासन निर्णयानुसार गावातील मराठा जातीच्या व्यक्तींना, गावातील, कुळातील, नातेवाईकांना कुणबी जातीचे प्रमाण पत्र मिळाले असल्यास त्याबाबत चौकशी करून प्रमाणपत्र देण्याबाबत कार्यवाही प्रस्तावीत आहे. म्हणजे हैदराबाद गॅझेटची सरकारने तात्काळ अंमलबजावणी केली. या निर्णयामुळे हैदराबाद संस्थानात असलेल्या पूर्वीच्या पाच आणि सध्याच्या आठ जिल्ह्यातील मराठ्यांना फायदा होणार आहे. जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचे हे सर्वात मोठे यश आहे.

### मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचा निर्णय

मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची देखील मागणी जरांगे पाटील यांनी केली होती. त्यावर राज्य सरकारने निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने काही गुन्हे मागे घेतले आहेत. काही गंभीर गुन्हे राहिले आहेत त्याबाबत न्यायालयात जाऊन ते गुन्हे मागे घेण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. सप्टेंबर अखेरपर्यंत आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घेऊ असे सरकारने लेखी आश्वासन दिले आहे.

### शिंदे समितीला कार्यालय

वंशावळ समिती गठित नाही. ती वंशवळ समिती गठित करावी तसेच शिंदे समितीला कार्यालय उपलब्ध नाही, ते कार्यालय उपलब्ध करून द्यावे हीदेखील मागणी करण्यात आली होती. हे दोन्ही निर्णय घेतल्याची माहिती मंत्री विखे यांनी जरांगे पाटील यांना यावेळी दिली.



### मराठा-कुणबी एक असल्याचा जीआर

मराठा आणि कुणबी एकच असल्याचा जीआर काढण्याची मागणी जरांगे पाटील यांनी केली होती. यावर सरकारने ही किचकट प्रक्रिया असल्याचे उत्तर दिले होते. यासाठी वेळ लागणार असून, एक महिन्याच्या कालावधी हवा आहे अशी मागणी शिष्टमंडळाने जरांगे पाटील यांच्याकडे केली होती. यावर जरांगे पाटील यांनी एक नाही तर दोन महिने घ्या आणि निर्णय घ्या असे सांगितले. दोन महिने घ्या पण मराठा-कुणबी एक असल्याचा जीआर काढा अशी मागणी जरांगे यांनी केली ती देखील मान्य करण्यात आली आहे.

### आंदोलनात बळी गेलेल्या कुटुंबीयांच्या वारसांना नोकरी

मराठा आरक्षणाच्या आंदोलनात बळी गेलेल्या कुटुंबीयांच्या वारसांना तात्काळ मदत व शैक्षणिक पात्रतेनुसार शासकीय नोकरी देण्याची मागणी देखील उपोषण करताना केली होती. त्याबाबत सरकारने असा निर्णय घेतला की, आंदोलनात बळी गेलेल्या कुटुंबीयांच्या वारसांना तात्काळ मदत देण्यासाठी १५ कोटींची आर्थिक तरतूद केली असल्याचे सांगितले. तसेच ही मदत एक आठवड्यात त्या कुटुंबाला दिली जाईल असे आश्वासन दिले. आत्महत्या केलेल्या कुटुंबातील एका सदस्याला त्याच्या शिक्षणाप्रमाणे राज्य शासनाच्या वेगवेगळ्या विभागात नोकरी देण्याचे सरकारने मान्य केले.

### मराठ्यांच्या ५८ लाख कुणबी नोंदी ग्रामपंचायतीत लावणार

मराठ्यांच्या ५८ लाख कुणबी नोंदी ग्रामपंचायतीत लावण्याची मागणीही राज्य सरकारने मंजूर केली आहे. लोकांना कुणबी नोंद झाली की नाही हे कळत नव्हते त्यामुळे ही मागणी करण्यात आली होती. याबाबत सरकारने सकारात्मक निर्णय घेतला. पुढील काळात मराठ्यांच्या ५८ लाख कुणबी नोंदी प्रत्येक ग्रामपंचायतीत लावण्यात येतील.

### धाराशिव शहरात जल्लोष

मनोज जरांगे पाटील यांच्या सर्व मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या आहेत ही बातमी कळताच धाराशिव शहरात मराठा बांधवांनी उत्स्फूर्तपणे जल्लोष करण्यास सुरुवात केली. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात तसेच राजमाता जिजाऊ चौकातही जिजाऊंना आणि छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून मिठाई वाटप करण्यात आली. यावेळी सर्वपक्षीय नेत्यांनी देखील रस्त्यावर उतरून आनंद साजरा केला. तरुणांनी जरांगे पाटील आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे पोस्टर हातात घेऊन जल्लोष केला. शहरातील वेगवेगळ्या गणेश मंडळांनी देखील हा आनंद साजरा केला. यावेळी महिलांनी देखील रस्त्यावर उतरून आनंद साजरा केला. यावेळी मराठा बांधवांनी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील आणि राज्य सरकारचे आभारमानले

---

**आरंभ मराठी** आंदोलकांसाठी तेरणा परिवाराच्या वतीने केली होती मुंबईत सोय

# आमदार राणा पाटील आंदोलकांच्या आणि सरकारच्याही मदतीला धावले

**आरंभ मराठी | धाराशिव**

तुळजापूरचे आमदार राणा पाटील यांची मराठा आंदोलनातील भूमिका दुहेरी ठरली. एकीकडे त्यांनी सरकारतर्फे आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी मदत केली तर दुसरीकडे मुंबईत गेलेल्या आंदोलकांनाही मदतीचा हात दिला. मनोज जरांगे पाटील यांनी ठेवलेल्या मागण्यांवर विचारविनिमय करण्यासाठी मराठा आरक्षण उपसमितीसोबत तुळजापूरचे आमदार राणा पाटील यांनीही मोलाचे योगदान दिले. उपसमितीत अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह शिवेंद्रसिंहराजे भोसले, माणिकराव कोकाटे, जयकुमार गोरे, उदय सामंत यांच्यासह आमदार राणा पाटील यांनीही जरांगे पाटील यांची आझाद मैदानात भेट घेतली. राधाकृष्ण विखे पाटील जरांगे पाटील यांच्यासोबत चर्चा करत असताना आमदार राणा पाटील हेदेखील विखे पाटील यांना काही मुद्दे सांगत होते. तसेच जरांगे पाटील यांना सरकारकडून दिलेला प्रस्ताव तयार करण्यात देखील आमदार राणा पाटील यांनी योगदान दिल्याचे सांगितले जात आहे. मंत्रीपद नसताना देखील आमदार राणा पाटील यांनी केलेली शिष्टाई आंदोलनाची कोंडी फोडण्यात यशस्वी झाली. यापूर्वी देखील जरांगे पाटील यांनी ज्या ज्या वेळी मराठा आरक्षणासाठी आंदोलन केले होते, त्या त्या वेळी सरकारतर्फे मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत चर्चा करण्यासाठी राणा पाटील हे आंतरवली सराटी येथे गेले होते. आमदार राणा पाटील यांनी यावेळी एकीकडे आंदोलकांना नेरुळ येथील त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून दिली होती. तर दुसरीकडे सरकारकडून जरांगे पाटील यांच्यासोबत चर्चा करण्यासाठी देखील प्रयत्न केल्याचे दिसले. या आंदोलनात आमदार राणा पाटील यांनी दुहेरी भूमिका पार पाडून मराठा आंदोलकांचे आणि राज्य सरकारचेही त्यांनी लक्ष वेधले.



# मोहा येथे मराठा समाजाचा जल्लोष; गुलाल उधळून घोषणाबाजी



**आरंभ मराठी | मोहा**

मुंबई येथे मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेले उपोषण पाचव्या दिवशी मागे घेण्याचा निर्णय घेतला. राज्य सरकारने सर्व मागण्या मान्य केल्याचे जाहीर होताच मराठा समाजामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या निर्णयाची माहिती मिळताच कळंब तालुक्यातील मोहा येथे मराठा समाजाच्या वतीने जल्लोष करण्यात आला. गावातील युवकांनी गुलाल उधळत ''एक मराठा लाख मराठा'' या घोषणांनी परिसर दणाणून टाकला. गावातील प्रमुख चौकात जमलेल्या मराठा बांधवांनी एकमेकांना गुलाल लावून आनंद व्यक्त केला. मराठा समाजाच्या दीर्घकाळ चाललेल्या लढ्याला न्याय मिळाल्याची भावना व्यक्त करत गावकऱ्यांनी जरांगे पाटील यांच्या नावाने जल्लोष केला. शासनाने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी तात्काळ व्हावी, अशी अपेक्षाही उपस्थितांनी व्यक्त केली. मोहा गावात झालेल्या या उत्स्फूर्त जल्लोषामुळे संपूर्ण परिसरात उत्सवासारखे वातावरण निर्माण झाले होते. मराठा समाजातील बांधवांच्या चेहऱ्यावर समाधान व अभिमानाचे हास्य झळकत होते.

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

संपादकीय

बुधवार, दि. 3 सप्टेंबर 2025

# उदात्त हेतूपूर्वक गणेशोत्सव व्हावेत !



तू सुखकर्ता
तु दु:खहर्ता ।
विनाशक मोरया !

भारतात सण, उत्सवांची एक महान परंपरा व संस्कृती आहे. भारतात सारे सण मोठ्या उत्सवाने आनंदोत्स्व साजरा करत असतात. गणेश उत्सव हा दहा दिवसांचा आनंदऋतू होय. कोरोनासारखे संकटहरण करणारा गणराय आणि त्याचा उत्सव हा समाजहित जोपासत एक आदर्श त्यानिमित्त आदर्श निर्माण केला पाहिजे. श्री गणरायाचे आगमन एक नवं चैतन्य निर्माण करत असते. आनंदाची पवर्णीच असते. पण या बरोबर एक उत्साही वर्ग उत्सवाच्या नावाखाली धार्मिक व सामाजिक भान विसरून जाऊन पावित्र्य धोक्यात आणून जनमनात प्रतिमा बिघडवण्याचे काम करत असतो. लोक पंरपरा, संस्कृती संवर्धन अशा मोठया सणांतून करण्याची अपेक्षा असते, परंतू त्याकडे हेतू पुरस्पर दुर्लक्ष केले जाते .लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव सुरु करण्यामागे पारतंत्र्याच्या काळात धार्मिक व सांस्कृतिक ध्रुवीकरण होऊन भारतीय समाज्यात एक मरगळ आली होती. स्वातंत्र्याचा हेतू उराशी ठेऊन समाज एकीकरणा साठी हरवलेला आत्मविश्वास पुर्नस्थापित करण्यासाठी शिवजयंती व गणेशोत्सवाचे टिळकांनी सार्वजनिक स्वरूप केले. दिवसेन दिवस वेगवेगळ्या आपत्तींचा सामना करावा लागत आहे. याची जाणीव मनी ठेवून व्यापक जनहिताचे कार्यक्रम हाती घेवून भविष्यातील संकटाला सामोरे जाता येईल. गणेशाची शाडूच्या मूर्ती जाऊन त्याठिकाणी प्लास्टर ऑफ पॅरीसच्या मूर्ती आल्याने विसर्जनावेळी त्या मूर्ती विरघळत नाही. तसेच निर्माल्य नदीत टाकले जाते. त्यामुळे जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होते. यामुळे जैवविविधता ही मोठ्या प्रमाणात नष्ट झाली आहे. नदी, तलावातील पाणी आटल्यावर ह्या मूर्ती उघड्या पडल्याने विटंबना होत आहे. शासनाने प्रत्येक उत्सवावेळी सुरक्षा व सामाजिक बांधिलकीचे आवाहन करत असते. विद्युत रोषणाईचा झगमगाट, मोठमोठे देखावे, दर्शनासाठी प्रचंड गोंधळ, दहा दिवसातून एकदा तरी नाचगाणी ठेवली जातात. विसर्जन मिरवणुकीत डीजे नाही तर एकाच वेळी शंभर ढोल ताशे वाजवले जातात. अश्या गोष्टींना शासनाने पायबंद घातला आहे. मिरवणुकीतही शिस्तबद्ध पणा दिसत नाही. अनेकदा विसर्जनास विलंब व अपघात होत असतात. मिरवणूकमध्ये पोलीस यंत्रणेवर येणारा प्रचंड ताण कमी करण्यासाठी मोठी धावपळ होणार आहे. करावी लागते.बदलत्या काळा बरोबर परंपरा जपणारी राष्ट्रीय भावना वाढीस लावणारी अनेक मंडळे आहेत. अनेक गावांत एक गाव एक गणपती तर शहरात एक वार्ड एक गणपती संकल्पना आजही राबवली जात आहे. अनेक गावांत पर्यावरण पूरक गणेश उत्सव होत आहे. मूर्तीदान असाही एक उपक्रम नजरेस पडतो. उत्सवासाठी जमा झालेल्या पैशाच्या योग्य विनियोग केला जात आहे. अनेक सामाजिक कामांना प्राधान्य दिले जात आहे. अशा संकल्पना राबवल्याने मोठे यश पोलीस प्रशासनास आले आहे. जो पर्यंत सामाजिक एकोपा आहे तो पर्यंत सामाजिक वीण विस्कटवण्याचे धारिष्ट कोणी करू शकत नाही. यात घरोघरी गणपती स्थापना होताना एक आनंदाचा क्षण नागरिकांना अनुभवयास मिळणार आहे. विसर्जनावेळी ग्रामीण भागात विहिरी, तळी, तलाव,नदी उपलब्ध आहे. मोठं मोठ्या शहरात मुर्तीदान व पालिका प्रशासनाने दिलेल्या टाकी मध्ये विसर्जन होते. त्यास संकट समय ओळखून साथ देणे हे राष्ट्रकार्य समजावे. यातून सामाजिक दायित्व म्हणून अनेक दुर्बल घटकांस अर्थ साहाय्य, गावपातळीवर असलेल्या छोट्या समस्या यातून सोडवल्या जाव्यात. सामाजिक उपक्रम, पर्यावरण विषयक, शैक्षणिक धोरणे हाती घेऊन अनेक गावातून ग्रामविकासाला गणेश मंडळांनी चालना देतील असे चित्र साध्य निर्माण झाले आहे. नैसर्गिक व राष्ट्रीय आपत्ती असताना मोलाचे योगदान देणे अवश्य आहे. अश्या स्तुत्य उपक्रमांमुळे राष्ट्र भावना टिकून राहील. येणाऱ्या काळाला गवसणी घालण्याचे काम अनेक गणेश मंडळांनी केले आहे. पुण्यात पाणशेत धरण फुटल्यावर व इतर आपत्ती काळात गणेश मंडळांनी योगदान दिले होते. याची आठवण करून दिली पाहिजे. अनेक मंडळे आपली कर्तव्य पार पडताना दिसली. गणपती ही बुद्धीची देवता आहे. तेव्हा मुलांची, जनतेची, बुद्धिमत्ता वाढीस लागेल, असे उपक्रम मंडळांनी राबवायला पाहिजेत. मंडळांनी रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिर, व्यवसाय मार्गदर्शन, स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन, शेती विषयक मार्गदर्शन आयोजन करायला हवे. दुष्काळग्रस्त, पूरग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत करायला हवी. गरीब मुलांचे शैक्षणिक पालकत्व, पर्यावरणासाठी देशी वृक्ष लागवड, शाळेतील मुलासाठी ऑनलाईन सांस्कृतिक कार्यक्रम, वक्तृत्व, निबंध स्पर्धांचे आयोजन करायला हवे. समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या



**विठ्ठल वळसे पाटील**
पुणे
मो. ८४८४०६६०४२

मान्यवरांचे व्याख्यान आयोजित करायला हवेत. हा उत्सव जितका साधेपणाने आणि विधायक मार्गाने साजरा केला जाईल, तितके त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल. सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रयोजन समाज एकत्रीत पणा जपणे, भेदाभेद दूर व्हावा, सामाजिक एकोपा, सामाजिकवीण असावी, लोकप्रबोधन बरोबर, मनोरंजन हवेच,संस्कृती व राष्ट्रविकास, ज्ञान यांची कास धरावी असा हा उदात्तहेतू असावा तरच येणाऱ्या काळात भारतीय संस्कृतीचे गोडवे जगभर गायले जातील.

# महाराष्ट्रातील तिसरा बेंबळीतील ११३ वर्षांचा आजोबा गणपती

महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जतन आणि समाजातील एकतेचा संदेश देण्यासाठी लोकमान्य टिळकांनी १८९७ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाची स्थापना केली. टिळकांच्या या हाकेला प्रतिसाद देत धाराशिव जिल्ह्यातील बेंबळी गावात १५ सप्टेंबर १९१२ रोजी आजोबा गणपतीची स्थापना करण्यात आली. मराठवाड्यातील दुसरा आणि महाराष्ट्रातील तिसरा सार्वजनिक गणपती म्हणून या गणेशाची नोंद आहे.

सदाशिव भडंगे, किसनराव मैंदर्ग, नागय्या स्वामी आणि गुंडोपंत कुलकर्णी यांनी या मंडळाची स्थापना करण्याचा पुढाकार घेतला. छत्रपती संभाजी नगर येथील विशेष पोलिस महानिरीक्षक कार्यालयात याची अधिकृत नोंद आहे. स्वातंत्र्यानंतर १९४८ मध्ये ही परंपरा टिकवण्यासाठी मंडळाची अधिकृत नोंदणी करण्यात आली. २०१२ मध्ये शताब्दी वर्ष मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. समाजोपयोगी उपक्रमांबरोबरच मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. तसेच राज्यस्थान (मकरान) येथून आणलेल्या गारूच्या मूर्तीची प्रतिष्ठापना झाली. आजही बेंबळीतील कला विकास गणेश मंडळ समाजोपयोगी उपक्रमांसह परंपरा जोपासत आहे.



## ऐतिहासिक विसर्जन मिरवणूक

बेंबळी गाव राज्यात ऐतिहासिक विसर्जन मिरवणुकीसाठी प्रसिद्ध आहे. गावातील दोन प्रमुख मंडळे छत्रपती शिवाजी तरुण गणेश मंडळ (छत्रपती शिवाजी चौक) आणि पालक्षत्रिय गणेश मंडळ (धनगर गल्ली) विसर्जन मिरवणुकीची अखंड परंपरा जपत आहेत.पूर्वी ४० गावांतील लोक बैलगाड्यांनी मिरवणूक पाहण्यासाठी येत असत. विसर्जनाच्या रथासाठी बैलगाड्यांना फराळी आंब्याच्या पानांची तोरणे, बैलांच्या शिंगांना इंगुळ लावून, हार–झूल लावून सजवले जात असे. पारंपरिक वाद्यांचा गजर, दारोदारी आरत्या, कट्ट्यांवर व गर्दीतून उठणारा उत्साह या साऱ्या वातावरणात गणरायाची मिरवणूक गावभरून निघायची.काळानुसार बैलगाड्यांच्या जागी रथ आणि नंतर ट्रॅक्टरने सजवलेल्या मिरवणुकीची परंपरा सुरू झाली. पूर्वी मिरवणूक रात्री ९ वाजता निघून पहाटे ५–६ वाजेपर्यंत चालायची. आता मात्र वेळ मर्यादित करून मध्यरात्री १२ पर्यंत विसर्जन पूर्ण होते.

## बेंबळीची ओळख

धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक एकोप्याचे प्रतीक म्हणून बेंबळी गावाने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. श्री गणेश स्थापनेपासून ते विसर्जनापर्यंतची ही अखंड परंपरा गावाच्या सांस्कृतिक इतिहासात ठळकपणे नोंदली जाते. महाराष्ट्रातील मानाचा गणपती, ऐतिहासिक विसर्जन मिरवणूक आणि ११३ वर्षांची अखंड परंपरा या बेंबळीच्या लौकिकात भर घालतात.

**महेश पाटील**
बेंबळी, तुळजापूर
९४२०८३८८३५

# लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**उमरगा:–** लग्नाचे आमिष दाखवून सतरा वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उमरगा तालुक्यातील एका गावात उघडकीस आली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, उमरगा तालुक्यातील एका गावातील १७ वर्षीय मुलीवर (नाव– गावगोपनीय) दिनांक ११ नोव्हेंबर २०२४ रोजी एका गावातील एका तरुणाने त्या मुलीला लग्नाचे अमिष दाखवून तरुणाने तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. तसेच शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. पिडीतेच्या आईने दिनांक १ सप्टेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम–४९,६४,६४ (२),६४(२)(एम), ३५१(३), ३५२ सह पोक्सो कलम ४, ८, १२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# पळसप येथे मराठा बांधवांचा जल्लोष




**आरंभ मराठी | पळसप**

मराठा समाजाच्या आरक्षणाठी राज्य शासनाने हैद्राबाद गॅझेट लागू केल्याबद्दल पळसप येथील मराठा समाजाच्या तरुणांनी गुलाल उधळून आणि साखर वाटून जल्लोष साजरा करत आनंद व्यक्त केला. यावेळी एक मराठा– लाख मराठा या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. मराठा बांधवांनी यावेळी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांचे आभार मानले.

# माणसा,तू माणूसच आहेस ना?

रात्रीचे दोन वाजले आहेत.सर्वत्र निरव शांतता पसरली आहे.शहरा जवळच्या वृध्दाश्रमातील सगळे वृध्द बहूतेक गाढ झोपीत आहेत. फक्त साठ वर्षे वयाची एक वृद्ध महिला जी नुकतेच वृध्दाश्रमात भरती झाली आहे ती अजुनही झोपी गेलेली नाही.ती सारखे रडते आहे,आपल्या नशीबाला दोष देत अश्रू ढाळत आहे.तेवढ्यात शेजारी असलेल्या वृध्द महिलेला जाग आली.तिने रडणाऱ्या महिलेकडे पाहिले.उठून बसली आणि रडणाऱ्या महिलेच्या खांद्यावर अलगद सहानुभूती पूर्वक हात ठेवला.आणि म्हणाली,'बाई अशी रात्री बेरात्री रडू नकोस. तू इथे नवीन आहेस.हळूहळू होईल सवय. माझ्याकडे बघ मला आता काही वाटत नाही.जीवनाचा फेरा कोणाला चुकलाय का? हा फेरा तर सोसावाच लागतो,जीवन कंठावेच लागते.' रडू थांबवून इतका वेळ रडणारी महिला दिनवाण्या स्वरात म्हणाली,'बाई आपण कोणाचं घोडे मारलं म्हणून आपल्याला ही शिक्षा मिळतेय. सुनांचे काय त्या परक्या असतात परंतु आपल्या मुलांनी आपल्याला वृध्दाश्रमाचा रस्ता का दाखवला?आपण त्यांच्या पालन पोषणात तर कुचराई केली नव्हती.' अशाप्रकारे त्या दोघींमध्ये बराच वेळ संवाद चालू होता.आपल्या नशिबाला दोष देत आणि रक्ताच्या नात्यांचा उध्दार करत त्या दोघी जणी एकमेकांची समजूत काढत होत्या. हृदय हेलावून टाकणारे आणखी एक असेच दृश्य.एका दवाखान्यात साधारणपणे सत्तर वर्षे वयाच्या एका पुरुषावर उपचार सुरू आहेत. घर व शेत नावावर करत नाही म्हणून मुलाने प्राणघातक हल्ला केला आहे.स्वार्थाच्या भरात आणि संपत्तीच्या मोहापायी मुलाने वडिलांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे.मृत्यूशी झुंज देणाऱ्या त्या वडिलांना काय वाटतं असेल?मुलाने असा हल्ला करणे त्यांना अपेक्षित नव्हते.आणि पहिल्या घटनेतील मुलाने आईला मागचा पुढचा विचार न करता वृध्दाश्रमात पाठवणे हे ही अपेक्षित नव्हते. परंतु,सध्या मानवतेला काळीमा फासणाऱ्या अशा अनेक घटना घडत आहेत.अशा विचित्र घटना ऐकून आणि पाहून हृदयात कालवाकालव होते.रक्ताच्या नात्यांपेक्षा स्वार्थ वरचढ ठरत आहे आणि माणूस राक्षसालाही लाज वाटेल असे अमानुष कृत्ये करत आहे.अशा अमानवी कृत्यांमुळे जीवाभावाच्या नात्यांमध्ये कटुता निर्माण झाली आहे. नुकतेच परळी रेल्वे स्थानकाच्या परिसरात चार वर्षे वयाच्या लहान चिमुरडीवर एका नराधमाने अत्याचार केल्याची वार्ता कानावर धडकली आणि तळपायाची आग मस्तकाला गेली. तो नराधम जणू राक्षसाच्या वंशातील असावा.तो इतके घाणेरडे कृत्य कसे काय करू शकतो?त्याच्या या कृत्याने मानवता थिजून गेली आहे.माणसे माणूस असुनही बेदिक्कतपणे असे घाणेरडे कृत्ये करून आपण माणूस नसल्याचे दाखवून देत आहेत.म्हणून मानवाच्या रुपातील अशा दानवांना प्रश्न विचारावा वाटतो नाहीतर समस्त मानव प्रजातीला प्रश्न विचारावा वाटतो, 'माणसा तू माणूसच आहेस ना?'आजकाल लोक मनात आले तसे वागत आहेत,मनाला पटेल तसे जीवन जगत आहेत.संयम,धीर, निस्वार्थी भावना,मानवता, दानशूरपणा अशी मूल्ये त्यागून नैतिक मुल्यांना पायदळी तुडवून माणूस कसाही वागत आहे.कधी कधी असे ही दिसते की एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला धर्माचे,विचारांचे, नितीमत्तेचे धडे तोंड पाठ सांगतो परंतु,स्वार्थाच्या मोहापुढे ते सगळे विसरुन तो क्षणात दानव बनतो आणि अमानवी कृत्ये करतो.अशा या अवैचारिक प्रवृत्तींमुळे आणि राग,लोभ,मत्सर,हेवा आणि उच्च कोटीचा स्वार्थ व अनियंत्रित वासना या अवगुणांमुळे माणसे माणूस कमी आणि दानवाच्या रुपात जास्त शोभून दिसत आहेत.आजकाल असे किती डॉक्टर आहेत जे समाजसेवा हीच ईश्वर सेवा समजून दवाखान्यात येणाऱ्या किती रुग्णांवर अगदी माफक दरात खात्रीलायक उपचार करतात?आपण असेही काही डॉक्टर पाहतो की ते एकाच भेटीत रुग्णांवर योग्य तो उपचार करत नाहीत.तीनचार वेळा खेपा मारल्यावर आणि मनमानी फीस भरल्यानंतर मग कुठे आजार कमी होतो. कोणताही दुकानदार माफक नफा मिळवून ग्राहकांना वस्तू विकत नाही.तो जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी धडपडत असतो.कोणता फळविक्रेता चांगले फळे कमी दराने विकतो?किती व्यापारी शेतकऱ्यांचा शेतीमाल व धान्ये चांगल्या दराने विकत घेतात? दुसऱ्यांच्या लेकरा बाळांच्या तोंडातील घास हिसकावून घेऊन आपले घर भरण्यासाठी माणसं कोणत्याही थराला जात आहेत!जिकडे तिकडे स्वार्थी लोकांचा सुळसुळाट सुरू आहे आणि कोणत्याही व्यवहारात फसवणूक केली जात आहे.काहीजण गोड बोलून केसाने गळा कापतात आणि आपला स्वार्थ साधून घेतात. किती लोक प्रामाणिक आहेत जे आर्थिक व्यवहारात पारदर्शकता ठेवतात?कोणाचे उसने घेतलेले पैसे लगेच परत करतात. दुसऱ्यांच्या आया बहिणींकडे वाकड्या नजरेने न बघता त्यांना आपल्या आई व बहिणीप्रमाणे सन्मानाची वागणूक देतात. एकंदरीत मुद्दा एवढाच आहे की आजच्या घडीला माणसांचे वर्तन आणि माणसांची दुष्कृत्ये पाहिली की समस्त मानव समुदायाला मनःपूर्वक एक प्रश्न विचारावा वाटतो की माणसा,तू माणूसच आहेस ना?हा प्रश्न आपण सर्वांनी प्रत्येकाला विचारला तर फार बरे होईल.आत्मचिंतन करण्याची सवय लागेल आणि प्रत्येक व्यक्तीला माणसासारखे वागण्याची सवय जडेल.



**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.
मो. ९७३०९३९७३२.

# ब्रिगेडियर ए. जी. बरबरे यांच्या हस्ते वैंभवी शेंडगे व सुशांत जाधव यांचा गौरव

**आरंभ मराठी | उमरगा**

छत्रपती संभाजी नगर चे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर ए. जी. बरबरे यांनी भारत शिक्षण संस्था संचलित श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी चे कॅडेटस वैभवी शेंडगे आणि सुशांत जाधव यांचा सोमवारी (दि.१) सत्कार करून अभिनंदन केले. ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूर यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ज्या कॅडेटसनी राष्ट्रीय, राज्यस्तरीय या ठिकाणी योगदान दिले. या बदल त्यांचा प्रमाणपत्र व किट देऊन दोघांचा सत्कार या वेळी करण्यात आला. वैभवी शेंडगे हिने २६ जानेवारी २०२५ रोजी राजपथ दिल्ली येथे पार पडलेल्या प्रजासताक दिनी महाराष्ट्राच्या संघातून ड्रिल परेड मध्ये तिने नेतृत्व केले होते. तसेच सुशांत जाधव ने ऑल इंडिया फायरिंग, थल सैनिक कॅंप फायरिंग स्पर्धेत इंटर ग्रुप कॉंपिटिशन पर्यंत तो मराठवाडा विभागात तो प्रथम आला होता. या सत्कार प्रसंगी ५३ महा बटालियन एनसीसी लातूरचे कमान अधिकारी कर्नल संतोष नवगन, सुभेदार मेजर शंभु सिंग व सर्व आर्मी स्टाफ कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. याबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल भैया मोरे, उपाध्यक्ष अश्लेष भैया मोरे तसेच सर्व संचालक मंडळ व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले, कॅप्टन डॉ. ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.




# मनोज जरांगे-पाटील यांना दिर्घायुष्य लाभावे यासाठी तुळजापूर येथे महाआरती

**आरंभ मराठी | तुळजापूर**

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे आझाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या दीर्घायुष्यासाठी व मराठा आरक्षणाची मागणी राज्य सरकारने लवकरात लवकर मान्य करावी त्यासाठी तुळजाभवानी मंदिरात पुजारी बांधवांच्या वतीने महाआरती करण्यात आली. पुजारी बांधवांनी श्री तुळजाभवानी मंदिरात एकत्र येऊन मनोज जरांगे पाटील यांना मराठा आरक्षणासाठी बळ दे, ताकद दे आणि समाजाच्या मागण्या मान्य होऊ दे म्हणून श्री तुळजाभवानी मंदिरात महाआरती करून देवीला साकडे घातले.यावेळी बाळासाहेब भोसले, कुमार टोले, धीरज जाधव, प्रशांत इंगळे, शाहूराज मगर, दिगंबर खुंटाफळे, सचिन अमृतराव, नितीन जट्टे, बापूसाहेब करडे, जीवन अमृतराव यांच्यासह पुजारी बांधव व भाविक भक्त उपस्थित होते.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
संमिश्र
बुधवार, दि. 3 सप्टेंबर 2025

# जरांगे पाटील यांनी उपोषण सोडताच भूम तालुक्यातील मराठा बांधवांचा जल्लोष



आरंभ मराठी | भूम

मराठा आरक्षणयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आरक्षणाच्या मागणीला सरकारने मान्यता दिल्याने भूम तालुक्यात भूम शहरासह वाडी वस्त्यावर मराठा बांधवांनी मोठा जल्लोष केला. मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी जरांगे पाटील गेल्या अनेक दिवसापासून लढा देत असून गेले पाच दिवस मुंबई येथे आमरण उपोषण करत होते. त्यांच्या उपोषणाला पाठिंबा म्हणून महाराष्ट्रातील लाखो युवक मुंबईमध्ये जमा झाले होते. महाराष्ट्र शासनाने गेल्या चार दिवसापासून आरक्षणाबाबत विचार विनिमय करून अखेर मराठवाड्यातील निजामकालीन दस्तऐवजानुसार आरक्षण देण्याचे जाहीर केले. आरक्षणाची घोषणा आझाद मैदानातून होताच ग्रामीण भागातील तरुणाईत आनंदाचा उत्साह भरून वाहत होता. भूम शहरामध्ये गोलाई चौकात मराठा तरुणांनी एकत्र येऊन गुलालाची उधळण केली व शेकडो तोफाची सलामी जरांगे पाटील यांना दिली. तालुक्यात पाथरूड, ईट, वालवड, माणकेश्वर गटातील सर्व गावांमध्ये आनंदाचा उत्साह भरून वाहत होता. ईट येथे तरुणांनी डीजे च्या तालावर गुलाल उधळत तोफांचे आवाज केले. जरांगे पाटील यांच्या अथक परिश्रमानंतर गावगाड्यातील गरीब मराठ्यांना या निर्णयामुळे आरक्षणचा लाभ होणार आहे. गावगाड्यातील मराठा युवक मुंबईहून परत येण्या अगोदरच गावागावात मोठा जल्लोष दिसून येत आहे.

# उमरगा येथे माझा वार्ड माझी जबाबदारी उपक्रमाचे खा. ओमराजे निंबाळकर यांच्या हस्ते उद्घाटन



आरंभ मराठी | उमरगा

उमरगा येथे नगरपालिकेच्या वतीने आयोजित ''माझा वार्ड माझी जबाबदारी '' या सार्वजनिक उपक्रमाचा शुभारंभ खासदार ओमराजे निंबाळकर व आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी रणधिर भाऊ सूर्यवंशी ,अमोल बिराजदार, विजयकुमार नागणे, अप्पराव गायकवाड, महादेव अण्णा कोराळे, अप्पराव गायकवाड ,सुधाकर पाटील, अजिंक्य बापू पाटील, मुख्याधिकारी जाधवर आदी. मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून त्या त्या वार्डातील स्थानिक प्रश्न, अडचणी नगरपालिका अधिकारी व कर्मचारी व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून सोडवण्याचा प्रयत्न चालू आहे. लाईट, पिण्याचे पाणी, नाली सफाई तसेच अनेक प्रकारच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न होणार आहे. इतर नगरपालिकेने देखील याचा आदर्श घ्यावा व उपक्रम राबवावा असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी उमरगा शहरातील हजारो नागरिक उपस्थित होते.

# कॅनव्हास इंटरनॅशनल स्मार्ट स्कूलमध्ये राज्यस्तरीय विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार



आरंभ मराठी | कळंब

राज्य स्तरीय ज्युनिअर आयएएस स्पर्धेत यश संपादन केलेल्या कॅनव्हास शाळेच्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याला हेमंत ढोकळे (तहसीलदार कळंब) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.राज्यस्तरीय स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. आजच्या स्पर्धात्मक युगात अशा प्रकारच्या शालेय स्पर्धा मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी म हत्वाच्या ठरतात. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञानवृद्धीच होत नाही तर आत्मविश्वास, जबाबदारीची जाणीव व नेतृत्वगुणही विकसित होतात, असे मनोगत हेमंत ढोकळे यांनी व्यक्त केले.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांचा पारंपरिक दांडपट्टा




आरंभ मराठी | मुरुम

जिल्हाक्रीडा अधिकारी कार्यालय, धाराशिव व गुरुकुल प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल, मुरुम यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच फिट इंडिया मोहिमेअंतर्गत हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन शाळेत उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेत विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. विशेष आकर्षण ठरलेली भारतीय पारंपरिक दांडपट्टा क्रीडा स्पर्धा मोठ्या जोशात पार पडली. विद्यार्थ्यांनी खेळाडूवृत्ती दाखवत विविध स्पर्धांत सक्रिय सहभाग नोंदवला.कार्यक्रमात यशस्वी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. खेळ जीवनासाठी किती महत्त्वाचे आहेत व त्यांचे शारीरिक–मानसिक आरोग्यावर काय फायदे होतात याबद्दल माहिती संस्थेचे सचिव आनंद चौधरी यांनी दिली. तर दांडपट्टा असोसिएशन, धाराशिवच्या जिल्हाध्यक्ष डॉ. प्रीती चिलोबा यांनी ''खेळ हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे; मन प्रसन्न ठेवण्यासाठी प्रत्येकाने एखादा खेळ खेळलाच पाहिजे'' असे विचार मांडले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका मयुरी चौधरी, सचिव आनंद चौधरी, शिक्षिका कोमल शिंदे, सर्व शिक्षक वृंद व क्रीडा शिक्षक महमदरफी शेख यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या या उपक्रमाला पालक, विद्यार्थी व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शाळेच्या पुढाकाराचे कौतुक केले.

# आकांक्षाताई चौगुले यांच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांग विद्यालयात खाऊचे वाटप



आरंभ मराठी | येणेगूर

उमरगा तालुक्यातील माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांची कन्या मराठवाडा युवासेना (युवती) निरीक्षक, शिवसेना तथा ज्ञानज्योती सामाजिक बहु उद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा ॲड. आकांक्षाताई चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली राजीव गांधी अपंग निवासी विद्यालय मुरूम मोड येथील विद्यार्थ्यांना यांच्या वाढदिवसानिमित्त खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी माजी उपसरपंच प्रभाकर येडगे, तंटामुक्त अध्यक्ष सतीश पाटील, अशोक माळी, श्रीकांत मंगरुळे,येणेगुर जिल्हा परिषद विभाग प्रमुख महादेव बिराजदार, शाखा प्रमुख गणेश बंडगर, खंडाप्पा हुळमजगे, नागेश पाटील, वैजिनाथ बिराजदार, राहुल स्वामी, बालाजी धामशेट्टी आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्री जयराम विद्यालयात गणेश उत्सवानिमित्त व्याख्यानमाला

आरंभ मराठी | नारंगवाडी



उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथील श्री जयराम विद्यालयात श्री गणेश व्याख्यान मालेचे दुसरे पुष्प गुंफण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रम ाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक अजय पवार होते तर प्रमुख पाहुणे म्हणून रेखाताई सूर्यवंशी (प्रदेश प्रवक्ता जिजाऊ ब्रिगेड महाराष्ट्र) या होत्या. यावेळी प्रमुख उपस्थिती श्रीमती हुग्गे व रेणुका इंगळे यांची होती.मोबाईलचा विळखा स्वतःला ओळखा या विषयावर विद्यार्थ्यांना म ार्गदर्शन करताना रेखाताई म्हणाल्या की, काळानुसार मोबाईल हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. त्यामुळे त्याचा वापर काळजीपूर्वक करावा. मोबाईलच्या आहारी न जाता आपल्या शैक्षणिक कार्यासाठी त्याचा उपयोग करावा. आपले ध्येय ठरवून विद्यार्थ्यांनी त्या दृष्टीने सतत प्रयत्नशील असणे गरजेचे आहे. झोपेत स्वप्न पाहू नका तर उघड्या डोळ्यांनी स्वप्न पहा व ते साध्य करण्यासाठी रात्रीचा दिवस करा. सतत प्रयत्नशील राहा. प्रयत्नाने सर्व काही साध्य होते. जीवनाकडे पाहताना विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टीने पहावे. स्वतः प्रती न्यूनगंड बाळगू नये. याबाबत माहिती देत असताना वेळोवेळी वेगवेगळी उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन सूर्यवंशी यांनी केले, तर आभार प्रभाकर बनसोडे सर यांनी मानले.यावेळी प्रशालेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंचायत समिती केंद्रप्रमुख शारदा चव्हाण सेवानिवृत्त



आरंभ मराठी | येणेगूर

तुळजापूर पंचायत समितीच्या केंद्र प्रमुख शारदा चव्हाण नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या. सेवानिवृत्तीचा कार्यक्रम पतंजली योग समिती धाराशिव यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.
या कार्यक्रमाला अध्यक्ष सुरेखा देशमाने ,प्रमुख पाहुणे पाठक यांची उपस्थिती होती.

# तुळजाई गणेश मंडळाच्या शिबिरात ६० दात्यांचे रक्तदान

## गणेश उत्सवानिमित्त विविध सामाजिक,सांस्कृतिक कार्यक्रम

आरंभ मराठी | तुळजापूर




तुळजापूर खुर्द येथील तुळजाई गणेश मंडळाच्या वतीने आयोजित शिबिरात ६० रक्तदात्यांनी रक्तदान केले दरम्यान तुळजाई मंडळांनी गत ३६ वर्षात ३५ रक्तदान शिबिराच्या माध्यमातून विक्रमी २८३५ बॅगा रक्त संकलन केल्याचे माजी नगराध्यक्ष तथा मंडळाचे मार्गदर्शक पंडितराव जगदाळे व तुळजाई पतसंस्थेचे चेअरमन राजाभाऊ देशमाने यांनी सांगितले.गणेशोत्सवानिमित्त तुळजाई मंडळाच्या वतीने सोलापूर येथील डॉ.हेडगेवार रक्तपेढी यांच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन मंडळाचे अध्यक्ष नानासाहेब भोजने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष सूरज जगदाळे, सचिव विकास भोजने, सहसचिव विवेक माहुले, बाळासाहेब शेरेकर कोषाध्यक्ष धीरज देशमाने,श्रावण डोके, सदस्य हनुमंत साबळे, मुक्तार शेख, दिपक माळी,राम ठेले तसेच मंडळाचे ज्येष्ठ सदस्य खंडू ताटे, मंडळाचे संस्थापक अध्यक्ष आदिनाथ तुळजापुरे, प्रा.निलेश एकदंते,प्रा. संतोष एकदंते, धनंजय कुंभार,म कसूद शेख, संजय देशमाने, संजय ढवळे, प्रमोद क्षीरसागर, सचिन माळी,संतोष रणसिंगे, ॲड.प्रतीक जगदाळे, अजय मोरे, असिफ शेख, वैभव भोजने, ज्ञानेश्वर साबळे वैभव लोले,औदुंबर भोजने,संकेत क्षीरसागर हणमंत भोजने,अक्षय ठेले सतीश भोजने आदी पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला.

## आरंभ मराठी — शिवसेना शेतकरी सेनेची सरकारकडे मागणी

# अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त झालेल्या तुळजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करा

आरंभ मराठी | तुळजापूर



तुळजापूर तालुक्यात यंदा अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना शेतकरी सेनेच्या वतीने तहसीलदार तुळजापूर मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांना निवेदन देण्यात आले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा द्यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, तुळजापूर तालुक्यातील खरीप हंगामात उडीद, सोयाबीन, मूग तसेच इतर पिके उभी असतानाच मुसळधार पावसामुळे पाण्याखाली गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण पीक उद्ध्वस्त झाले असून, शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ शेतकरी वर्गावर येऊन ठेपली आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीने पिकांचे पाहणी करून पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत व नुकसानभरपाईसाठी तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. शिवसेना शेतकरी सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रशासनाने शेतकऱ्यांच्या भावनांचा विचार करून तातडीने मदत जाहीर केली पाहिजे. अन्यथा मोठ्या प्रमाणावर शेतकरी हालाखीच्या स्थितीत जाण्याची भीती आहे. या निवेदनाची माहितीस्तव प्रत धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक व धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना देण्यात आली आहे. यावेळी शेतकरी सेनेचे तालुका प्रमुख गणेश नेपते, तालुकाप्रमुख अमोल जाधव,तुळजापूर शहर प्रमुख बापूसाहेब भोसले,तुळजापूर शहर उपप्रमुख रमेश चिवचिवे,संभाजी नेपते,लक्ष्मण नन्नवरे,बाळू भैय्ये,सुहास सांळुखे,संजय लोंढे,शहाजी हक्के,स्वप्निल सुरवसे,आप्पासाहेब पाटील,दिपक मोटे,कपील देवकते,लक्ष्मण माळी यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिराढोण ग्रामपंचायत अकार्यक्षम,नितीन पाटील यांचे भीक मांगो आंदोलन

आरंभ मराठी | शिराढोण

कळंब तालुक्यातील मोठे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिराढोण गावात ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यातूनच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे तालुका अध्यक्ष नितीन पाटील यांनी ग्रामपंचायतीविरोधात घोषणा देत 'भीक मांगो आंदोलन' छेडले. गावात नव्याने उभारण्यात आलेले बसस्थानक मूळ गावापासून काही अंतरावर असल्याने सुरुवातीला बसगाड्या बाहेरील मार्गाने वळवण्यात आल्या होत्या. यामुळे बाहेरगावाहून आलेल्या प्रवाशांना पायी मोठा पल्ला गाठून घर गाठावे लागत होते. या संदर्भात नितीन पाटील यांनी पालकमंत्र्यांकडे पाठपुरावा करून बस सेवा गावातूनच सुरु करून घेतली होती. मात्र, १५ ऑगस्ट रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे सौंदणाआंबा रस्त्यावरील मातीचा पूल खचला. त्यामुळे या मार्गाने येणारी बस सेवा बंद झाली. रस्ता दुरुस्तीसाठी मुरुम टाकण्याची मागणी पाटील यांनी ग्रामपंचायतीकडे वारंवार केली, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या विरोधात प्रतीकात्मक आंदोलन म्हणून त्यांनी गावातील लोकांकडून भीक मागून पैसे जमा केले व ते ग्रामपंचायतीकडे सुपूर्द केले.



## गावकऱ्यांच्या सोयीसाठी पाठपुरावा सुरू आहे

शिराढोण सौंदना आंबा या रस्त्यावरून ये–जा करणाऱ्या नागरिकांना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या रस्त्यावर आवश्यक दुरुस्ती, पुल व साईड पट्ट्याचे काम तातडीने व्हावे यासाठी ग्रामपंचायत कार्यालय शिराढोण तर्फे जि.प. बांधकाम विभाग, कळंब येथे १९ ऑगस्ट रोजीच अधिकृत मागणी करण्यात आली आहे.
गावकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी व वाहतुकीसाठी हा रस्ता लवकरात लवकर कार्यान्वित व्हावा यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरु आहे.

**– लक्ष्मी म्हेत्रे**
सरपंच, शिराढोण

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
आपलं धाराशिव
बुधवार, दि. 3 सप्टेंबर 2025

# जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा असलेले शहर म्हणून नागपूरची नवीन ओळख

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**आरंभ मराठी | नागपूर**

महामेट्रोने अल्पावधीत जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांचा विकास केल्यामुळे नागपूर या शहराला जागतिक ओळख मिळाली आहे. महामेट्रोने कामठी मार्गावरील सर्वात लांब 'डबल डेकर' पुलाची निर्मिती केली असून या पुलाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. जागतिक दर्जाच्या या पुरस्कारामुळे नागपूर हे जगातील उत्कृष्ट पायाभूत सुविधा असलेले शहर म्हणून नवीन ओळख निर्माण झाली असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. या जागतिक पुरस्काराबद्दल महामेट्रोच्या अधिकाऱ्यांना त्यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या.रामगीरी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष उपस्थितीत गिनिज वर्ल्ड रेकॉर्डचे भारतातील प्रतिनिधी स्वप्नील डोंगरीकर यांनी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांना गिनिज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाल्याचे प्रमाणपत्र प्रमाणपत्र प्रदान केले. कामठी मार्गावरील डबल डेकर व्हायाडक्ट (मेट्रो) हा जगातील डबल डेकर व्हायाडक्ट आहे. मेट्रो व हायवे वाहतुकीसाठी ५.६३७ कि.मी. लांबीचा सिंगल कॉलम पिल्लरवर उभा असून हा स्थापत्य कलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग करुन बांधलेल्या या उड्डाणपुलाची गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डतर्फे नोंद घेतली आहे. यापुर्वी छत्रपतीनगर येथील ३.२ कि.मी. लांबीच्या डबल डक्ट उड्डाणपुलाची निर्मितीसाठी जागतिक स्तरावर नोंद घेण्यात आली होती. नागपूरला या निर्मितीमुळे संत्रा शहरासोबतच पायाभूत सुविधांचे शहर म्हणून नवीन ओळख मिळाली आहे. या पुरस्काराने नागपूरचा गौरव जागतिक स्तरापर्यंत पोहचला आहे. या डबल डेकर पुलाच्या निर्मितीसोबतच कामठी मार्गावर रेल्वे, महामार्ग वाहतूक तसेच मेट्रो वाहतुकीसाठी जगात प्रथमच अशा प्रकारच्या उड्डाणपुल तयार करण्यात आला आहे. हे जगातील अभियांत्रिकीमधली आश्चर्य आहे. या पुलासाठी १ हजार ६५० टन स्टिलचा वापर करण्यात आला आहे. जगातील पहिल्या सर्वात लांब डबल डेकर व्हायाडक्ट या पुलाचे सर्व देशांना आकर्षण आहे. प्रत्यक्ष निर्मितीसंदर्भातील माहिती घेण्यासाठी अभियांत्रिकी व वास्तुकलेतील तज्ञ भेट देवून पाहणी करत आहे. अशा प्रकारच्या डबल डेकर पुलांची निर्मिती करणारे महामेट्रो व नागपूर हे पायोनिअर असल्याचे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले. प्रारंभी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. त्यानंतर महामेट्रोतर्फे बांधण्यात आलेल्या भारतातील सर्वात लांब डबल डेकर मेट्रो व्हायाडक्ट या पुलाच्या निर्मितीसंदर्भातील चित्रफित यावेळी दाखविण्यात आली. तंत्रज्ञानाचा अतुलनिय वापर करुन उड्डाणपुलावर गड्डीगोदाम, कडबीचौक, इंदोरा चौक, नारी रोड, ऑटोमोटीव्ह चौक या पाच मेट्रो स्थानके बांधण्यात आली आहे. हा उड्डाणपुल चार पदरी असून पहिल्या स्तरावर महामार्ग, दुसऱ्या स्तरावर मेट्रो आणि जमिन स्तरावर आधीच असलेला महामार्ग आहे. या उड्डाणपुलामुळे कामठी मार्गावरील प्रचंड वाहतूक कोंडीतून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. यापूर्वी छत्रपती चौकाचा समावेश असलेल्या उड्डाणपुलाला देखील गिनिज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समावेश करण्यात आला आहे. यावेळी महामेट्रोचे संचालक अनिलकुमार कोकाटे, प्रकल्प संचालक राजीव त्यागी, कार्यकारी संचालक नरेश गुरबानी, महाव्यवस्थापक यतिन राठोड, मुख्य प्रकल्प व्यवस्थापक एन व्ही पी विद्यासागर , प्रकल्प संचालक प्रकाश मुदलियार आदी अधिकारी तसेच गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

# वॉटर शेडच्या पाणी पुस्तिकेचे सीईओ डॉ. मैनाक घोष यांच्या हस्ते प्रकाशन



**आरंभ मराठी | धाराशिव**

वॉटर शेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या माध्यमातून जिल्ह्यात पाणी, स्वच्छता, शिक्षण,आरोग्य व रोजगार या बाबींवर काम करण्यात येत आहे. याबरोबरच पाणी व स्वच्छते संदर्भात वॉटर शेडने तयार केलेल्या पाणी व स्वच्छता माहिती पुस्तिकेमध्ये आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची माहिती संकलित केलेली आहे. त्यामुळे ते पुस्तक जिल्ह्यातील प्रत्येक गावांसाठी उपयुक्त असून त्या पुस्तकाच्या प्रती जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये वितरित करणार असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मैनाक घोष यांनी मंगळवारी (दि.२) केले. जिल्हा परिषदेच्या कै यशवंतराव चव्हाण सभागृहात वॉटर शेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या वतीने तयार करण्यात आलेल्या पाणी व स्वच्छता या पुस्तिकेचे प्रकाशन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.घोष यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. डॉ. घोष पुढे म्हणाले की, शासनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या पिण्याचे पाणी प्रत्येकाला स्वच्छ मिळेल यासाठी प्रयत्न करावेत. तर स्वच्छता संदर्भात सर्व नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेण्यासह शौचालयाचा वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे घराची स्वच्छता करण्यासह परिसर व पर्यायाने संपूर्ण गावाची स्वच्छता केल्यास गावातील प्रत्येक नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज राऊत,ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता कटकदौंड,उपकार्यकारी अभियंता बप्पासाहेब ढवळे,उपअभियंता नरेंद्र भुसारे,दत्तात्रय पाचंगे,अरविंद सिद्राल,एस के शिंदे (यांत्रिकी) पवार (देखभाल दुरुस्ती),वाटर संस्थेचे प्रतिनिधी आदेश ठोंबरे यांच्यासह शाखा अभियंता अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमृतराव परिवाराकडून आयुर्वेदाचा प्रसार करणारा आकर्षक देखावा

**आरंभ मराठी | तुळजापूर**




प्राचीन भारताची समृद्ध परंपरा असलेल्या आयुर्वेदाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी अमृतराव परिवाराने महालक्ष्मी समोर आयुर्वेदिक वनस्पतीची माहिती सांगणारा देखावा सादर केला आहे. महालक्ष्मी समोर शेवगा, कोरफड, गवती चहा, ववा आदि १६ आयुर्वेदिक वनस्पतीचे विविध रोगावरील उपाय सांगण्यात आले आहेत. बदलत्या जीवनशैलीमध्ये रोजच्या जगण्यात नवनवीन आजार सामोरे येत आहेत. यासाठी आपल्या परिसरात उपलब्ध वनस्पतींचा वापर रोजच्या आयुष्यात केल्यास शरीर नैसर्गिकरित्या उत्तम राहील आणि कृत्रिम प्रक्रिया केलेल्या बाबी शरीरात कमी जातील. यासाठी शहरातील लोहीया नगर परीसरातील सुंदरबाई अमृतराव, कल्याणी अमृतराव व अपर्णा अमृतराव यांनी दैनंदिन उपयोगात आणि वापरात येणाऱ्या १६ आयुर्वेदिक वनस्पतींची माहिती देणारा देखावा महालक्ष्मी समोर मांडला आहे. अमृतराव परिवाराने आपल्या घरात या सर्व आयुर्वेदिक वनस्पतीची लागवड केली आहे. अमृतराव परिवाराच्या या उपक्रमाचे कौतुक होत असून महिलांनी आयुर्वेदिक वनस्पतीची माहिती घेण्यासाठी गर्दी केली होती.

# भोसले हायस्कूलमधील पालक मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**आरंभ मराठी | धाराशिव**



श्रीपतराव भोसले हायस्कूल येथे आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य सुधीर पाटील यांच्या संकल्पनेतून ओपन डे चे आयोजन इयत्ता पाचवी व सहावीच्या वतीने पर्यवेक्षक बालाजी गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी पाचवी व आठवीच्या सर्व वर्गशिक्षकांनी आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांना व पालकांना घटक चाचणी परीक्षा पहिलीच्या सर्व विषयाच्या उत्तरपत्रिका दाखविल्या तर पालकांनी आपल्या पाल्याची झालेली प्रगती पाहून समाधान व्यक्त केले. आपल्या पाल्याच्या अभ्यासाविषयीच्या अडचणी संबंधित वर्गशिक्षकांना व विषय शिक्षकांना सांगितल्या. या ओपन डे ला विशेष उपस्थिती संस्था सरचिटणीस प्रेमाताई पाटील यांनी सदिच्छा भेट देऊन विद्यार्थी पालकांशी संवाद करून आपणास कांही अडचणीबाबत विचारणा केली. यावेळी प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक राजेंद्र जाधव, बालाजी गोरे, सुनील कोरडे, श्रीमती बी.बी. गुंड उपस्थित होते. या ओपन डे ला विद्यार्थ्यांसह पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा



**आरंभ मराठी | उमरगा**

उमरगा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धाराशिव व जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा यांच्या वतीने फिट इंडिया मोहिमे अंतर्गत हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनी राष्ट्रीय क्रीडा सप्ताहाचे आयोजन जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथे दिनांक २५ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट दरम्यान करण्यात आले होते. यावेळी लाठी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे, क्रीडा शिक्षक महंमद रफी शेख, धनराज तेलंग, बशीर शेख उपस्थित होते. या क्रीडा सप्ताहामध्ये प्रशालेत विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. यावेळी लाठी काठी, दांडपट्टा, टेनिस बॉल क्रिकेट, बेसबॉल, डॉज बॉल युनिफाईट इत्यादी खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी प्रशालेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा; विविध क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन

**आरंभ मराठी | धाराशिव**



हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्म दिन २९ ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे उत्साहात साजरा करण्यात आला. या पार्श्वभूमीवर दिनांक २५ ते २९ ऑगस्ट या कालावधीत दोरी उड्या, जिम्नॅस्टिक्स, लिंबू चमचा, रोपस्कीपिंग, योगा,१०० मी. व २०० मी. धावणे, कराटे, तलवारबाजी, लेझीम, लाठीकाठी, शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची बॅडमिंटन स्पर्धा आदी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. २९ ऑगस्ट रोजी श्रीपतराव भोसले माध्यमिक विद्यालय, धाराशिव येथे मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. या प्रसंगी महाराष्ट्र ऑलपिंक असोसिएशनचे उपाध्यक्ष व शिवछत्रपती पुरस्कारार्थी डॉ. चंद्रजित जाधव,पोलीस उपअधिक्षक अश्विनी भोसले,प्रशासकीय अधिकारी डॉ.मंजुळा पाटील,माजी उपसंचालक (क्रीडा व युवक सेवा) जनक टेकाळे,जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे,प्राचार्य नंदकुमार ननवरे,उपमुख्याध्यापक प्रमोद कदम,क्रीडा शिक्षक विक्रम सांडसे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.या वेळी राष्ट्रीय खेळाडू तन्वी भोसले हिने सर्व मान्यवर व खेळाडूंना शपथ दिली.तसेच आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तालुका क्रीडा अधिकारी भैरवनाथ नाईकवाडी, क्रीडा अधिकारी अक्षय बिरादार, मार्गदर्शक डॉ.शुभांगी रोकडे,डिंपल ठाकरे,विश्वास खंदारे,सुरेश वालवडकर,सुनिल घोगरे,किशोर भोकरे,सुरेश कळमकर व व्यंकटेश दंडे यांनी परिश्रम घेतले.

# नारंगवाडीची वाडी येथे गौरी आवाहन, पूजन आणि विसर्जन मोठ्या उत्साहात

**आरंभ मराठी | नारंगवाडी**




उमरगा तालुक्यातील नारंगवाडीची वाडी येथे गौरी आवाहन, पूजन आणि विसर्जन मोठया उत्साहात साजरे करण्यात आले. गौरीचे आगमन ज्येष्ठा नक्षत्रावर होते म्हणून तिला 'ज्येष्ठा गौरी' म्हणतात. तसेच गौरीने असुरांचा संहार केला व शरण आलेल्या स्त्रियांना आणि त्यांच्या कुटुंबाला तसेच पृथ्वीवरील प्रत्येकाला सुखी केले. महालक्ष्मीच्या कृपाप्रसादाने आपल्याला सौभाग्य प्राप्त झाले, म्हणून तेव्हापासून सर्व स्त्रिया महालक्ष्मी गौरीची पूजा करू लागल्या अशी आख्यायिका सांगितली जाते आपल्याकडे गौरी आवाहन करण्याच्या विविध पद्धती प्रचलीत आहेत. कुलाचार आणि परंपरेनुसार महालक्ष्मीचे आवाहन, पूजन केले जाते. काही कुटुंबात गौरींचे मुखवटे असतात, तर काही कुटुंबात परंपरेनुसार पाणवठ्यावर जाऊन पाच, सात किंवा अकरा खडे आणून त्यांची पूजा करतात. काही ठिकाणी पाच मडक्यांच्या उतरंडी करून त्यावर गौरीचे मुखवटे लावून त्या उतरंडींनाच साडी चोळी नेसवून त्यांची पूजा करतात. काही घरांमध्ये धान्याची रास म्हणजेच गहू, तांदूळ, ज्वारी, हरभरा, डाळ इत्यादींपैकी एकदोन धान्याचे ढीग करून त्यावर मुखवटे ठेवतात. बाजारात पत्रे, लोखंडी सळ्या किंवा सिमेंटचे स्टँण्ड मिळतात त्यावर गौरीचे मुखवटे ठेवतात आणि त्याला साडी नेसवून विधीवत पूजा करतात. काही घरांमध्ये सुपात धान्याची रास ठेवून त्यावर मुखवटा ठेवतात. ज्येष्ठा गौरीच्या आवाहनाच्या वेळी दोन गौरी बसविण्याची प्रथा आहे. त्यामधील एक गौरी घरातच असते, तीच लक्ष्मी होय तर एक गौरी बाहेरून आणली जाते. तीच ज्येष्ठागौरी होय. ही ज्येष्ठागौरी घरात येताना तिचाही उल्लेख ''लक्ष्मी'' या नावानेच केला जातो. जमिनीवर रांगोळीने आठ पावले काढून त्यावरील प्रत्येक पावलावर ती थोडी थांबवून लक्ष्मीच्या विविध प्रकारांचा उल्लेख होतो. त्यामध्ये अष्टलक्ष्मीचा समावेश असतो. हीच संकल्पना महिला आपल्या भाषेत सांगताना, ''गौर आली गौर'' ''कशाच्या पाऊलांनी आली?'' ''गाईवासरांच्या पावलाने आली' असे म्हणतात. ही एकूण आठ पाऊले असून त्यात आपल्या गरजेनुसार गाईवासरे, धनधान्य, अलंकार, पुत्रपौत्र, दीर्घायुष्य, व्यवसायातील प्रगती, परीक्षेतील यश अशा अनेक मनोकामनांचा उल्लेख केला जातो. यावर्षी काही घरांमध्ये मराठा आरक्षण मिळावे अशी प्रार्थना केल्याचे दिसून आले. वाडी येथे अलका सुरवसे, पल्लवी सूर्यवंशी, सखूबाई सुरवसे, सुनीता सूर्यवंशी, छाया सूर्यवंशी, जिजाबाई सूर्यवंशी, मनीषा सुरवसे, रेषाबाई सुरवसे, वैष्णवी सूर्यवंशी यांनी उत्साहात हा सण साजरा केला.

## आरंभ मराठी | चौक सुशोभित करण्याचा विकास फाउंडेशनचा निर्धार

# कनगरा पाटी चौकाला स्व. अण्णासाहेब पाटील यांचे नाव; ग्रामसभेचा ऐतिहासिक ठराव

**आरंभ मराठी | धाराशिव**



धाराशिव तालुक्यातील कनगरा ग्राम पंचायतीच्या ग्रामसभेत कनगरा पाटी चौकाला क्रांतिसूर्य स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांचे नाव देण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. ग्राम पंचायत सभागृहात सरपंच सूरज इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.ठरावामध्ये म्हटले आहे की, स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांनी मराठा समाजासाठी केलेले कार्य आणि त्यांचे बलिदान चिरस्मरणीय आहे. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी तसेच भावी पिढीला प्रेरणा मिळावी या उद्देशाने चौकाला त्यांचे नाव देण्यात येत आहे.सरपंच सूरज इंगळे यांनी ठराव मांडला तर सदस्य नितीन इंगळे यांनी अनुमोदन दिले. ठरावासाठी सामाजिक कार्यकर्ते रमेश दळवे यांनी पुढाकार घेतला.दरम्यान, या निर्णयाचे स्वागत करत अण्णासाहेब पाटील विकास फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष खंडू राऊत यांनी गावकऱ्यांचे मनः पूर्वक आभार मानले. गावाने घेतलेला हा ऐतिहासिक निर्णय स्व. अण्णासाहेबांच्या कार्याला खऱ्या अर्थाने आदरांजली आहे. लवकरच या चौकात भव्य कमान उभारून त्याला सुशोभित करण्याचा मनोदय असल्याचे त्यांनी आरंभ मराठीला सांगितले.

### चौक स्मृतीचा ठेवा ठरणार

गावकऱ्यांच्या एकमुखी निर्णयामुळे कनगरा पाटी चौक स्व.अण्णासाहेब पाटील यांच्या स्मृतीचा शाश्वत ठेवा ठरणार असून, भावी पिढ्यांना प्रेरणा देणारा ठरेल.
– **रमेश दळवे**, सामाजिक कार्यकर्ते, कनगरा

# मोहा येथे गौरी-लक्ष्मी देखाव्यात मराठा आरक्षण आंदोलनाचे प्रतिबिंब

**आरंभ मराठी | पळसप**



मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण मिळावे या मागणीसाठी मुंबईत आझाद मैदानावर सुरू असलेल्या संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला अखेर यश मिळाले असून, राज्य सरकारने सर्व मागण्या मान्य करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे राज्यभरात समाधानाचे वातावरण आहे. या ऐतिहासिक लढ्याला पाठींबा दर्शवण्यासाठी मोहा (ता. कळंब) येथील अमोल बाळासाहेब मडके यांच्या घरी गौरी–लक्ष्मीच्या देखाव्यामध्ये आंदोलनाचे दृश्य साकारण्यात आले होते. विशेष म्हणजे, जरांगे पाटील उपोषणाला बसलेले असताना मिळणारा प्रचंड लोकसमर्थनाचा देखावा येथे प्रतिकात्मकरित्या मांडण्यात आला होता. गौरी–लक्ष्मीच्या उत्सवात परंपरेने धार्मिक व सांस्कृतिक देखावे लावले जातात. मात्र यंदा सामाजिक न्यायाच्या हक्कांशी निगडीत विषय हाताळल्याने हा देखावा सर्वांचे लक्ष वेधून घेणारा ठरला. छोट्यांपासून मोठ्यांपर्यंत गावकऱ्यांनी या देखाव्याला भेट देत आंदोलनाशी एकात्मता व्यक्त केली. गावकऱ्यांनी सांगितले की, ''प्रत्यक्ष मुंबईला जाता आले नाही, पण आम्ही गावातच या पद्धतीने आंदोलनाला पाठिंबा दिला. आता सरकारने मागण्या मान्य केल्याने आम्हा सर्वांना समाधान मिळाले आहे. आरक्षणाचा हक्क मिळवण्यासाठी झालेला हा लढा ऐतिहासिक ठरला आहे.'' दरम्यान, राज्यभरात आंदोलनाला मिळालेला अभूतपूर्व लोकसमर्थन आणि सरकारची सकारात्मक भूमिका यामुळे मराठा समाजाच्या आरक्षण लढ्याला नवा टप्पा मिळाला आहे. ''एक मराठा, लाख मराठा'' या घोषणेसह समाजभावना अधिक बळकट झाल्याचे चित्र दिसत आहे.